# १. इतिहास लेखन: पाश्चात्त्य परंपरा

पाठाचा सारांश :

प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत उपलब्ध पुराव्यांवरून त्या-त्या काळातील मानवी जीवन, त्या काळची परिस्थिती, त्यांच्या जीवनातील घडामोडी यांचे जे लेखन केले जाते त्याला इतिहास लेखन म्हणतात.

इतिहास म्हणजे भूतकाळातील घटनांची नोंद व अभ्यास.

इतिहास लेखनामध्ये पुढील बाबींचा समावेश होतो.

- उपलब्ध ऐतिहासिक माहितीचे संकलन करणे व विश्लेषण करणे.
- ती माहिती, स्थळ, काळ यांच्या संदर्भात माहिती करून घेणे.
- त्या माहितीच्या संदर्भात योग्य प्रश्नांची मांडणी करणे.
- उपलब्ध माहितीचे संदर्भ तपासून चिकित्सक संशोधन करणे.

इतिहासाचे संशोधन हे पुढील उद्देशाने केले जाते.

1. भूतकाळात घडून गेलेल्या घटनांचे आकलन करून घेणे.
2. ऐतिहासिक घटनांची माहिती तपासणे.
3. सखोल अभ्यास करून त्यातील तथ्य समोर ठेवणे.
4. गतकाळातील घटनांची क्रमशः संगती लावणे.

प्राचीन काळात इतिहासलेखनाची व घटनांची नोंद करण्याची पद्धत नव्हती. वडिलधाऱ्या व्यक्तींकडून पूर्वजांच्या पराक्रमाच्या ऐकलेल्या गोष्टी पुढील पिढीला सांगितल्या जात. तसेच गुहाचित्रांद्वारे गीत व पोवड्याचे गायन करून स्मृतींचे जतन केले जात असे.

आधुनिक इतिहासलेखनाची पद्धती शास्त्रशुद्ध आहे. तिची सुरुवात योग्य प्रश्नांची मांडणी करण्यापासून होते. हे प्रश्न मानवकेंद्रीत असतात. त्याचा संबंध देवदवतांच्या कथांशी न जोडता पुराव्यांना महत्त्व दिले जाते.

पण अठराव्या शतकात इतिहास लेखनात बदल झाले. इतिहास लेखनात वैज्ञानिक पद्धतीने ऐतिहासिक घटनांचा शोध घेण्याचा प्रयत्न सुरू झाला. ईश्वर विषयक चर्चा व त्यासंबंधीचे तत्त्वज्ञान यांचे महत्त्व कमी झाले. वस्तुनिष्ठतेला महत्त्व येत गेले. इतिहास विषयाला महत्त्व येऊन त्याचा सखोल अभ्यास सुरू झाला.

इतिहासलेखनाचे शास्त्र विकसित करणारे काही महत्त्वाचे विचारवंत.

**1) रेने देकार्त:-** (१५९६ -१६५०) फ्रेंच तत्त्वज्ञ - इतिहासलेखनासाठी ऐतिहासिक साधने विशेषतः कागदपत्रे यांची खात्री करून घेणे आवश्यक आहे, हे मत आग्रहाने मांडणारे विचारवंत. तसेच 'डिसकोर्स ऑन द मेथड' या त्यांच्या ग्रंथात शास्त्रशुद्ध संशोधनाच्या दृष्टीने एखादी गोष्ट सत्य आहे अशी जोपर्यंत खात्री होत नाही तोपर्यंत तिचा स्वीकार करू नये, हा विचार मांडला.

**2) व्हॉल्टेअर:-** (१६९४- १७७८) मूळ नाव- फ्रान्सा मरी अरुए, फ्रेंच तत्त्वज्ञ. याला ‘आधुनिक इतिहास लेखनाचा जनक’ असे म्हणतात. इतिहासाची मांडणी करतांना मानवी जीवनाचा सर्वांगीण विचार व्हायला हवा हा विचार यांच्यामुळे पुढे आला.

**3) लिओपॉल्ड व्हॉन रांके-** (१७९५-१८८६) जर्मन तत्त्वज्ञ .मूळ दस्तऐवजांच्या आधारे प्राप्त झालेली माहिती सर्वाधिक महत्त्वाची आहे यावर भर देऊन इतिहासलेखनातील काल्पनिकतेवर टीका केली. इतिहासाच्या मांडणीवर भर दिला. 'द थिअरी अँण्ड प्रॅक्टिस ऑफ हिस्टरी ' आणि 'द सिक्रेट ऑफ वर्ल्ड हिस्टरी' यात त्यांच्या विविध लेखांचे संकलन आहे.

**4) जॉर्ज विल्हेम फ्रेडरिक हेगेल** (१७७०-१८३१) - जर्मन तत्त्वज्ञ

ऐतिहासिक वास्तव तर्कशुद्ध पद्धतीने मांडण्यावर भर 'रिजन इन हिस्टरी' हे पुस्तक प्रसिद्ध 'एनसायक्लोपीडिया ऑफ फिलॉसॉफीकल सायन्सेस' यात त्यांचे विविध लेखाचे संकलन आहे.

**5) कार्ल मार्क्स (१८१८-१८८३) जर्मन तत्त्वज्ञ** - इतिहास हा अमूर्त कल्पनांचा नसून जिवंत माणसांचा आहे. ही महत्त्वाची संकल्पना मांडली. 'दास कॅपिटल' हा ग्रंथ जगप्रसिद्ध आहे.

**6) मायकेल फुको (१९२६-१९८४)** फ्रेंच इतिहासकार.

'आर्केऑलॉजी ऑफ नॉलेज' या ग्रंथात इतिहासांची कालाक्रमानुसार अखंड मांडणी करण्याची पध्दत चुकीची आहे असे प्रतिपादन केले आहे. पुरातत्त्वामध्ये अंतिम सत्यापर्यंत पोहचणे हे उद्दिष्ट नसून भूतकाळातील स्थित्यंतरांचे स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न असतो याकडे त्याने लक्ष वेधले. मनोविकृती, वैद्यकशास्त्र, तुरुंगव्यवस्था यासारख्या विषयांचा त्याने इतिहासाच्या दृष्टीने विचार केला.

* **अॅनल्स प्रणाली** - विसाव्या शतकाच्या सुरुवातीस फ्रान्समध्ये अॅनल्स या नावाने उदयाला आलेली प्रणाली.

या प्रणालीमुळे इतिहासाचा अभ्यास हा राजकीय घडामोडी, राजे त्यांची युद्धे, नेते व राजकारण या पुरता मर्यादित नसतो हा विचार पुढे आला. तर इतिहासात तत्कालीन हवामान, स्थानिक लोक, शेती, व्यापार, तंत्रज्ञान, दळणवळण, संपर्काची साधने, सामाजिक विभागणी, समूहाची मानसिकता याचाही अभ्यास करणे महत्त्वाचे मानले जाऊ लागले.

**स्त्रीवादी इतिहासलेखन –** सीमाँ द बोव्हा या फ्रेंच विदुषीने स्त्रियांच्या दृष्टीकोनातून केलेल्या इतिहासाची पुनर्रचना ही स्त्रीवादी इतिहास लेखनाची भूमिका मांडली. यात स्त्रिया केंद्रबिंदू मानून त्यांच्या आयुष्याशी निगडित रोजगार, नोकरी, त्यांचे कौटुंबिक आयुष्य, त्यांच्यासाठी काम करणाऱ्या संस्था, त्यांच्या विविध पैलूंचा विचार करून त्यावर संशोधन करून इतिहास लेखनावर भर दिला गेला.